# प्राचीन भारतातील धार्मिक प्रवाह

## जैन व बौद्ध धर्म उदयाची कारणे

- ✓ शूद्र व स्त्रियांची अवस्था खालावली होती. त्यांना वेदाभ्यासाची मनाई.
- ✓ वर्ण व्यवस्थेत ताण.
- ✓ ब्राह्मणांना अवास्तव महत्व प्राप्त झाले.
- ✓ वेदकाळाच्या शेवटी यज्ञविधींमधील बारीकसारीक तपशिलाना नको एवढे महत्त्व आले.
  उपनि षदांमधील वि चार आत्म्या चे अस्ति त्व, आत्म्या चे स्वरूप यांवर भर देणारा होता.सर्वसामान्यां ना समजायला अवघड होता.
- ✓ इ.स.पू. सहाव्या शतकात सर्वसाधारण मनुष्याला सहज कळेल असा धर्मा चा वि चार मांडण्या चा प्रयत्न करणारे विचारप्रवाह निर्मा ण झाले. प्रत्ये क व्यक्तीला स्वत:च्या उन्नतीचा मार्ग शोधण्या चे स्वा तंत्र्य आहे, याची जाणीव अनेकांना झाली.

**जैन धर्म :**

'जिन' या शब्दा पासून जैन हा शब्द तयार होतो.
जैन धर्मानुसार या धर्माचे 24 तीर्थंकर झालेले आहेत. ऋषभदेव हे पहिले तीर्थंकर . ( त्यांचा जन्म अयोध्या मध्ये ) . पार्श्वनाथ हे 23 वे तीर्थंकर.

**वर्धमान महावीर :**

हे 24 वे तीर्थंकर. जैन परंपरेत असे मानले जाते की 6 व्या शतकाच्या पूर्वार्धात महावीरांचा जन्म आजच्या बिहार, भारत मधील वैशाली जवळील कुंडलपूर ( कुंडग्राम ) येथे राजा सिध्दार्थ ( क्षत्रीय कुल ) व राणी त्रिशलामाता यांचेपोटी क्षत्रिय कुटुंबात (इ. स. पू. 540 मध्ये) झाला विकारांवर विजय मिळवणारे महान वीर म्हणून वर्ध मान यांना महावीर म्हटले जाते. भगवान महावीर हे वीर , अतिवीर , सन्मति आणि वर्धमान म्हणूनही ओळखले जातात. सुमारे तीस वर्षे उपदेश. अर्धमागधी या लोकभाषेतून शिकवण . लोकांना उपदेश करण्या साठी तीर्थंकरांच्या ज्या सभा होत, त्यां ना 'समवसरण' असे अर्ध मागधी भाषेत म्हणत असत, हे समवसरण समतेवर आधारलेले असे. या समवसरणांमध्ये सर्व वर्णातील लोकांना प्रवेश असे.वयाच्या 72 व्या वर्षी म्हणजे इ.स. पू. 468 मध्ये निर्वाण झाले. ( राजगीर जवळ पावापुरी )
अहिंसा परमो धर्म हे ब्रीदवाक्य. आपल्या उपदेशात अनेकांतवाद मांडला. सत्याचा शोध घेत असताना अनेक पैलू विचारात घेणे असा अर्थ
जैन दर्शनात नऊ तत्वे: जीव , अजीव, पुण्य, पाप, अस्त्रव, संवर, निर्जरा, बंध , मोक्ष.
दोन पंथ : 1) श्वेतांबर – पांढरे वस्त्र परिधान करणारे. 2) दिगंबर ( वस्त्र न परिधान करणारे. )
जैन धर्माच्या अल्प प्रसाराची कारणे. : 1) क्लिष्ठ सिद्धान्त 2) क्लिष्ठ जैन दर्शन 3) अत्यधिक अहिंसा 4) राजकीय आश्रयचा अभाव. 5) भव्यत्वाचा अभाव 6) प्रचार साधनाचा अभाव. 7) ब्राह्मण आणि बौद्ध धर्माशी स्पर्धा 8) दोषपूर्ण संघटन 9) दोन पंथात विभाजन 10) भारतावर विदेशी आक्रमण

**त्रिरत्ने**

1) . सम्यक् दर्शन : उपदेशातील सत्य जाणून घेऊन त्यावर श्रद्धा ठेवणे.
2) . सम्यक् ज्ञान : उपदेशाचा आणि तत्त्वज्ञानाचा नित्य अभ्या स करून, त्याचा सखोल अर्थ समजून घेणे.
3). सम्यक् चारित्र: पंचमहाव्रतांचे काटेकोर आचरण करणे.

**जैन धर्माच्या शिकवणुकीचे सार**

**पंचमहाव्रते**

1) सत्य
2) अहिंसा
3) अस्तेय ( चोरी न करणे. )
4) अपरिगृह ( द्रव्य संचय न करणे )
5) ब्रह्मचर्य

## बौद्ध धर्म

गौतम बुद्ध (इ.स.पू. ५६३ – इ.स.पू. ४८३) हे बौद्ध धर्माचे संस्थापक होते.. बुद्धांचे मूळ नाव 'सिद्धार्थ' होय.

शाक्य गणराज्याचा राजा शुद्धोधन व त्यांची पत्नी महाराणी महामाया (मायादेवी) यांचे पोटी इ.स.पू. ५६३ मध्ये जन्म लुंबिनी येथे झाला. नाव 'सिद्धार्थ'

सिद्धार्थाच्या जन्मानंतर अवघ्या सातव्या दिवशीच त्यांची आई महामायाचे निधन झाले. आईचे छत्र हरवलेल्या सिद्धार्थाचा सांभाळ त्यांची मावशी व सावत्र आई महाप्रजापती गौतमीने केला. त्यामुळे सिद्धार्थाला 'गौतम' या नावानेही ओळखले जाते. यशोधरा या राजकुमारीशी सिद्धार्थ गौतमाचा इ.स.पू. ५४७ मध्ये विवाह झाला. त्यांना राहुल नावाचा पुत्र झाला.

'शाक्यमुनी' (शाक्यांचा मुनी) हे गौतमाचेच दुसरे नाव. बुद्ध हे बौद्ध धर्माचे मुख्य स्तंभ आहेत.

### ज्ञानप्राप्ती

गृहत्यागानंतर सिद्धार्थ गौतमाने ज्ञानप्राप्तीसाठी खूप चिंतन केले, कठोर तपस्या केली आताच्या .बिहार राज्यातील ऊरुवेला / बोधगया येथे निरंजना नदीच्या काठी पिंपळाच्या वृक्षाखाली धानस्थ बसले असता, इ५२८ .पू.स. मध्ये वैशाखी पौर्णिमेच्या दिवशी त्यांना दिव्य ज्ञानप्राप्ती झाली या .'दिव्य ज्ञाना'ला 'संबोधी', 'बुद्धत्व' किंवा 'निर्वाण' असेही म्हणतात .'बुद्ध' म्हणजे अतिशय ज्ञानी मनुष्य . बुद्धांना पिंपळाच्यावृक्षाखाली 'बुद्धत्व' प्राप्त झाले म्हणून या वृक्षाला 'बोधिवृक्ष' (ज्ञानाचा वृक्ष.असे म्हणतात ( त्यां नी त्यां चे पहिल प्रवचन वाराणसीजवळ सारनाथ येथे दिल याप्रवचनात त्यां नी जो उपदेश केला, त्या स 'धम्म' असे म्हटले जाते. या प्रवचनाद्वारे त्यांनी धम्मा च्या चक्राला गती दिली म्हणून या घटनेला 'धम्मचक्कपवत्तन' असे पाली भाषेत म्हटले जाते. संस्कृत मध्ये धर्मचक्र प्रवर्तन म्हणतात. त्यांनी आपला उपदेश पाली या लोकभाषेत केला. बौद्ध धम्मा मध्ये बुद्ध, धम्म आणि संघ यांना शरण जाण्या ची संकल्पना महत्त्वाची आहे. या संकल्पनेला 'त्रिशरण' असे म्हणतात.

### पंचशील

गौतम बुद्धां नी पाच निय मांचे पालन करण्या स सांगि तले. त्या नियमांनाच 'पंचशील' असे म्हणतात.

१. प्राण्यां ची हत्या करण्या पासून दूर राहणे.
२. चोरी करण्या पासून दूर राहणे.
३. अनैति क आचरणापासून दूर राहणे.
४. असत्य बोलण्या पासून दूर राहणे.
५. मादक पदार्थ च्या सेवनापासून दूर राहणे.

### आर्य सत्ये

मानवी जीवनातील सर्व व्यवहारांच्या मुळाशी चार सत्ये आहेत. त्यांना आर्यसत्ये म्हटलेले आहे.

१. दुःख : मानवी जीवनात दुःख असते.
२. दुःखाचे कारण : दुःखाला कारण असते.
३. दुःख-नि वारण : दुःख दूर करता येते.
४. प्रतिपद : प्रति पद म्हणजे मार्ग .

### आष्टांगि क मार्ग

1. **सम्यक दृष्टी :-** निसर्ग नियमाविरुद्ध कोणतीही गोष्ट होऊ शकते ही गोष्ट न मानणे.
2. **सम्यक संकल्प :-** म्हणजे योग्य निर्धार, विचार.
3. **सम्यक वाचा :-** करुणायुक्त व सत्यपूर्ण वाचा (बोल) ठेवण्याचा प्रयत्न करणे.
4. **सम्यक कर्मांत :-** उत्तम कर्म म्हणजे योग्य कृत्ये करणे.
5. **सम्यक आजिविका :-** वाईट मार्गाने आपली उपजीविका न करता ती सन्मार्गानेच करणे.
6. **सम्यक व्यायाम :-** वाईट विचार निर्माण झाल्यास त्याचा त्वरित नाश करणे.
7. **सम्यक स्मृती :-** तात्त्विक गोष्टींचे स्मरण करून चित्तास (मनाला) जागृत ठेवणे.
8. **सम्यक समाधी :-** कोणत्याही वाईट विकारांना स्पर्श होऊ न देता दुष्ट प्रवृत्तीपासून मन अलग ठेवून चित्त प्रसन्न आणि शांत ठेवणे.

## दहा पारमिता

बुद्धांनी सांगितलेल्या या दहा पारमिता ह्या शील मार्ग होत.

1. **शील -:** शील म्हणजे नीतिमत्ता, वाईट गोष्टी न करण्याकडे असलेला मनाचा कल.
2. **दान -:** स्वार्थाची किंवा परतफेडीची अपेक्षा न करता दुसऱ्याच्या भल्यासाठी स्वत:ची मालमत्ता, रक्त, देह अर्पण करणे.
3. **उपेक्षा -:** निरपेक्षतेने सतत प्रयत्न करीत राहणे.
4. **नैष्क्रिम्य -:** ऐहिक सुखाचा त्याग करणे.
5. **वीर्य -:** हाती घेतलेले काम यत्किंचितही माघार न घेता अंगी असलेल्या सर्व सामर्थ्यानिशी पूर्ण करणे.
6. **शांति -:** शांति म्हणजे क्षमाशीलता, द्वेषाने द्वेषाला उत्तर न देणे.
7. **सत्य -:** सत्य म्हणजे खरे, माणसाने कधीही खोटे बोलता कामा नये.
8. **अधिष्ठान -:** ध्येय गाठण्याचा दृढ निश्चय.
9. **करुणा -:** सर्व प्राणिमात्र, मानवाविषयीची प्रेमपूर्ण दयाशीलता.
10. **मैत्री -:** मैत्री म्हणजे सर्व प्राणी, मित्र, शत्रूविषयी देखील नव्हे तर सर्व जीवनमात्रांविषयी बंधुभाव बाळगणे.

बौद्ध संघ : आपल्या धम्मा चा उपदेश करण्या साठी त्यां नी भिक्खूं चा संघ निर्मा ण केला. गृहस्थ जीवनाचा त्या ग करून संघात प्रवेश करणाऱ्या त्यां च्या अनुयायांना 'भिक्खू ' असे म्हटले जाते. बुद्धां प्रमाणे भि क्खू ही चारिका करून लोकांना धम्मा चा उपदेश करत असत. स्त्रियांचा स्वतंत्र संघ होता. त्यांना भिक्खुनी असे म्हणतात. बौद्ध धर्मा त सर्व वर्णतील व जातींमधील लोकांना प्रवेश होता.

बौद्ध धर्माच्या शाखा. 1) हिणयान 2) महायान 3) थेरवाद

| हीनयान | महायान |
|---|---|
| मूळ धर्म स्वरूप | धर्माचे संशोधित रूप |
| फक्त बुद्ध उपदेश मान्य | इतर उपदेशही मान्य. |
| कार्यक्षेत्र कमी | व्यापक |
| बुद्ध महापुरुष | देवता प्रतिरूप |
| प्रतीक पुजा | मूर्ति पुजा |
| बोधिसत्वावर विश्वास | बोधिसत्वावर विश्वास नाही |
| पाली भाषेत ग्रंथ | संस्कृत ग्रंथ |

थेरवाद : या संज्ञेचा अर्थ गुरु जनाची शिकवन: पाली धर्म ग्रंथातील शिकवण चे पालन करतात. विद्वानांचा धर्म समजला जातो.

बौद्ध धर्म परिषदा :

1) पहिली बौद्ध धर्म परिषद :
- राजगृह ( इ. स. पू. 487) . 500 अनुयायी .
- बौद्ध धर्माचे सिद्धांताचे संकलन करणे हा उद्देश .
- तत्वज्ञान दोन भागात विभागण्यात आले. ( विनयपिटिका व धम्मपिटिका )
- अध्यक्ष ; महाकश्यप.

2) दुसरी बौद्ध धर्म परिषद ::
- वैशाली येथे : इ.स.पू.387 मध्ये. ( कालशोक )
- अध्यक्ष : यक्ष किंवा सारकामिनी
- याच परिषदेत महायान व हिणयान असे दोन पंथ तयार.

3) तिसरी बौद्ध धर्म परिषद :
- पाटलीपुत्र ( सम्राट अशोकाच्या काळात )
- अध्यक्ष : मोगलीपुत्र तिस्स.
- अभिधम्म पिटका मध्ये कथावत्थु चा समावेश

3) चौथी बौद्ध धर्म परिषद :
- कुंडलवन , काश्मीर (सम्राट कणिष्काच्या काळात )
- अध्यक्ष : वसुमित्र ( अश्वघोष उपाध्यक्ष )
- हिणयान पंथाच्या तत्वांना अंतिम स्वरूप. .

- पाचवी बौद्ध धर्म परिषद: इ. स. 57 गांधार काश्मीर सहावी बौद्ध धर्म परिषद: इ. स. 157 गांधार काश्मीर

**बौद्ध त्रिपिटक :** तीन विभागात संग्रहीत केलेले ग्रंथ .

त्रिपिटक

विनयपिटक : पाच ग्रंथ
बौद्ध संघाच्या व्यवस्थेचे नियम, संघाच्या विकासातील घटना

सुत्तपिटक : पाच ग्रंथ
बुद्धाच्या सामान्य उपदेशांचा संग्रह व धम्मावरील संभाषणे.

अभिधम्म पिटक :
सात ग्रंथ
बौद्ध तत्वज्ञानाचे वैज्ञानिक विवेचन

सुत्तपिटकमधील पाच ग्रंथ किंवा निकाय:

1) दीर्घ निकाय ( दीर्घ प्रवचने ) 2) मंझिम निकाय ( मध्यम आकाराची प्रवचने) 3) संयुक्त निकाय ( समिश्र प्रवचने ) 4) अंगुत्तर निकाय ( प्रवचने) 5) खुददक निकाय ( जातक कथा आणि धम्म पद यासह समिश्र वाङमय )

बुद्धांचा प्रवास:

1)सारनाथ
ज्ञानप्राप्ती नंतर ऊरुवेला येथून निघून प्रथम ऋषिपट्टम म्हणजेच सारनाथ येथे. तेथे पाच शिष्यांना उपदेश व दीक्षा . धर्मचक्र प्रवर्तन। सर्वप्रथम तपसू आणि मल्ली या दोन् शिष्यांना उपदेश . सारनाथ येथे 1000 भिकखू चा संघ स्थापन केला व कश्यप याला प्रमुख नेमले. 2) वाराणसी : सारनाथ हून वाराणसी . या ठिकाणी यसा नावच एक अनुयायी तयार केला.

3) राजगृह : वाराणसी हून राजगृह .बिंबिसार राजाने वेळूवन नावाचे विहार बुद्धाना दान दिले. सरीपुत्र व मोगल्लणा , उपाली , अभय हे ब्राह्मण तत्वज्ञ यांच्याशी धार्मिक वाद विवाद झाले . पुढे ते बौद्ध संघात सामील झाले.

4) कपिलवसतू : त्याचे कुटुंबातील सदस्यांना बौद्ध धर्माची दीक्षा .

5) अनुपिया : कपिलवसतू हून ते अनुपिया या ठिकाणी आले. शाक्य राजा भाद्रिक त्याचा अनुयायी बनला.

6) वैशाली: अनुपिया येथून वैशाली या ठिकाणी आले. त्याठिकाणी कूटग्रहशाला हे विहार त्यांना मिळाले. प्रसिद्ध नर्तिका आम्रपाली त्यांची अनुयायी बनली. तिने आम्रवाटिका संघासाठी भेट दिली. प्रथमच स्त्रीला बौद्ध संघात प्रवेश

7) सुमसुमरगिरी येथे बोधिकुमार अनुयायी बनले.

8) पुढे कोसल च राजा प्रसेनजीत हा अनुयायी बनला व पुब्बराम विहार भेट दिले. त्याच ठिकाणी अंगुलीमल नावाचा दरोडेखोराला शिष्य बनवले.

9) पुढे पावा ( मल्ल ची राजधानी ) याठिकाणी त्यांना जेवणात शुकरमाधवा नावाचा पदार्थ खायला घातला गेला त्यामधून विषबाधा झाली. त्याच वेदनेत ते कुशिनगर येथे पोहचले व वयाच्या 80 व्या वर्षी इ. स. पू. 483 मध्ये त्यांचा मृत्यू झाला. त्या घटनेस महापरिनिर्वाण असे म्हणतात.

10) बुद्ध पावसाळ्यात एका ठिकाणी थांबायचे त्यास वसा म्हणत.

बुदधांची इतर नावे. 1) सिद्धार्थ – लहानपणीचे 2) गौतम 3) भारजीत म्हणजे लोक जीत 4) तथागत - सत्या चे ज्ञान झालेला 5) शास्ता - जगाचा राज्यकर्ता 6) आणि अनंत

लोकायत :

लोकायत किंवा चार्वाक या नावाने ओळखला जाणारा प्राचीन काळातील विचार प्रवाह . **चार्वाक** हे एक प्राचीन भारतीय भौतिकवादी आणि नास्तिक दर्शन होते .त्याचा भर स्वतंत्र विचारावर होता.
त्याने वेदांचे प्रामाण्य नाकारले. ह्या दर्शनात "प्रत्यक्षहेच " प्रमाण आहेया शब्दात ., प्रति आणि अक्ष अशी दोन पदे आहेतअक्ष म्हणजे . इन्द्रिय; त्यामुळे प्रत्यक्ष म्हणजे जे इंद्रियांना अनुभवता येते ते" .शब्द" आणि "अनुमान" याला मर्यादा आहेत .
यामुळे आत्मा, ईश्वर आणि स्वर्ग या गोष्टींना या तत्त्वज्ञानात स्थान नाही. चार्वाक मताप्रमाने जे ज्ञान इंद्रियांच्या द्वारे बुद्धीला होते तेच अस्तित्वात आहे असे समजले जातेचैतन्याला वेगळे अस्तित्व नाही आणि देह नष्ट झाला की ते .चैतन्य हे जडापासूनच निर्माण होते . .नष्ट होते

ज्यू धर्म:
ज्यू धर्मा चे लोक साधारणपणे इसवी सनाच्या पहि ल्या ते ति सऱ्या शतकात केरळमधील कोचीन येथे आले असावेत. ज्यू धर्माला 'यहुदी' धर्म असेही म्हटले जाते. देव एकच आहे, असे ज्यू धर्मीय मानतात. ज्यू धर्मा च्या शिकवणीत न्याय , सत्य, शांती, प्रेम, करुणा, विनम्रता, दान करणे, चांगले बोलणे आणि स्वाभिमान या गुणांवर भर .
त्यांच्या प्रार्थनास्थळाला 'सिनॅगॉग' असे म्हणतात.

ख्रिश्चन धर्म:
ख्रिश्चन धर्माची स्थापना येशू ख्रिस्तांनी केली. येशू ख्रिस्तांच्या १२ शि ष्यां पैकीएक असणारे सेंट थॉमस हे इसवी सनाच्या पहिल्या शतकात केरळमध्ये आले. त्यांनी त्रिचूर जिल् ह्यातील पल्लयूर येथे इसवी सन ५२ मध्ये चर्चची स्थापना केली. ख्रिश्चन धर्मा च्या शिकवणीनुसार देव एकच आहे. तो प्रेमळ पिता आहे आणि सर्वशक्ति मान आहे.
'बायबल' हा ख्रिश्चन धर्मा चा पवि त्रधर्म ग्रंथ आहे. ख्रिश्चन लोकांच्या प्रार्थनास्थळाला'चर्च ' असे म्हणतात

इस्ला म धर्म :
इस्लाम हा एकेश्वरवाद मानणारा धर्म आहे. अल्ला एकच असून मुहम्मद पैगंबर त्या चे प्रेषि त आहेत. ईश्वराचा संदेश पैगंबरांमार्फ त पवित्र कुरआन या धर्म ग्रंथा मधून प्रकट झालेला आहे. 'इस्ला म' या शब्दाचा अर्थ 'शांती' असा आहे. या शब्दा चा अर्थ 'अल्लाहला शरण जाणे' असाही होतो.. मनुष्या ने आयुष्यात कसे वागावे, याचे मार्ग दर्श न पवि त्र 'कुरआन'या धर्म ग्रंथात केलेले आहे. भारत आणि अरबस्तान यांमध्ये फार प्राचीन काळापासून व्यापारी संबंध होते. अरबस्तानातील व्या पारी केरळच्या किनाऱ्यावरील बंदरांना भेट देत असत. इसवी सनाच्या सातव्या शतकात अरबस्तानात इस्ला मचा प्रसार झाला. त्या च शतकात अरबी व्यापाऱ्यांमार्फ त भारतामध्ये इस्लामचे आगमन झाले. इस्लाम धर्माच्या प्रार्थनास्थळाला 'मशीद' असे म्हणतात.

पारशी धर्म:
पारशी लोक आणि वैदिक संस्कृतीचे लोक यांच्या मध्ये प्राचीन काळापासून संबंध होते. पारशी धर्माचा पवित्र ग्रंथ - 'अवेस्ता ' 'ऋग्वेद' आणि अवेस्ता यांतील भाषेमध्ये साम्य आहे. पारशी लोक इराणच्या 'पार्स ' किंवा 'फार्स ' नावाच्या प्रांतातून भारतात आले, म्हणून त्यांना 'पारशी' या नावाने ओळखले जाते. ते प्रथम गुजरातमध्ये आले. ते इसवी सनाच्या आठव्या शतकात आले असावेत असे काहींचे मत आहे. झरथुष्ट्र हे पारशी धर्मा चे संस्थापक होते. 'अहुर मज्द् ' या नावाने त्यां च्या देवाचा उल्लेख केला जातो. पारशी धर्मा मध्ये अग्नी आणि पाणी या दोन तत्त्वां ना अत्यंत महत्त्व आहे. त्यांच्या देवळांमध्ये पवित्र अग्नी प्रज्वलित केलेला असतो. त्या देवळांना 'अग्यारी' असे म्हणतात. उत्तम विचार, उत्तम वाणी आणि उत्तम कृती ही तीन प्रमुख आचरणतत्त्वे हा पारशी विचारसरणीचा गाभा आहे.

महाजनपदे


---

वैदिक कालखंडाच्या उत्तरार्धात म्हणजेच इपूर्व १००० ते ५०० च्या दरम्यान.स. भारतात काही राज्ये अस्तित्वात होती, त्यांना 'महाजनपदे' असे म्हणत त्यात मुख्य अशी .'सोळा महाजनपदे' अस्तित्त्वात होती. बौद्ध ग्रंथापैकी अंगुत्तर निकाय, निदेश, विनय पिटक यामध्ये ही नावे आढळतात .त्यां तील काही जनपदांमध्ये राजेशाही काहींमध्ये मात्र गणराज्य होते. जनपदांमधील ज्ये ष्ठ व्यक्तींची 'गणपरिषद'

असे. गणपरिषदेचे सदस्य एकत्रितपणे चर्चा करून राज्यकारभारासंबंधीचे निर्णय घेत असत. अशा चर्चा जिथ  होत, त्या सभागृहास ‘संथागार’ असे म्हटले जाई. गौतम बुद्ध शाक्य गणराज्या तील होते. प्रत्ये क जनपदाची स्वतंत्र नाणी होती.

सोळा महाजनपदे

| महाजनपदे | राजधानी | सध्याचा प्रदेश |
|---|---|---|
| अंग | चंपा | चंपा,बिहार,भारत |
| अवंती | उज्जयनी | उज्जैन,मध्यप्रदेश,भारत |
| अश्मक | पाटन | औरंगाबाद,महाराष्ट्र,भारत |
| कंबोज | कंबोज | अफगाणिस्तान |
| काशी | काशी (वाराणसी) | बनारस,उत्तर प्रदेश,भारत |
| कुरु | हस्तिनापुर, इंद्रप्रस्थ | दिल्ली,भारत |
| कोसल | श्रावस्ती, कुशावती | लखनौ,उत्तर प्रदेश,भारत |
| चेदी | शुक्तीमती | कानपूर,उत्तर प्रदेश,भारत |
| पांचाल | अहिच्छत्र, कांपिल्य | रोहिलखंड,मध्यप्रदेश,भारत |
| मगध | गिरिव्रज,राजगीर | पटना,बिहार,भारत |
| मत्स्य | विराटनगर | जयपूर,राजस्थान,भारत |
| मल्ल | कुशीनगर | गोरखपूर,उत्तर प्रदेश,भारत |
| वत्स | कौशांबी | अल्लाहाबाद,उत्तर प्रदेश,भारत |
| वृज्जी | वैशाली | विशाली,बिहार,भारत |




प्रमुख गणराज्ये:

दीर्घ निकायातील उल्लेखानुसार :

- शाक्य – कपिलवसतू
- मल्ल – पावा
- लिच्छवी – वैशाली
- विदेह  - मिथीला
- कोलिया –  रामग्राम
- बुलीस – कलकप्प
- कालाम – केसापुत्त
- पिप्पलीवण – मोरीय

| | | |
|---|---|---|
| **शूरसेन** | मथुरा | मथुरा,उत्तर प्रदेश,भारत |
| **गांधार** | तक्षशीला,<br>पुरुषपूर(पेशावर) | पेशावर,खैबर<br>पख्तूनख्वा,पाकिस्तान |

अंग :
सध्याचा बिहार : चंपा नदीच्या किनाऱ्यावर .
व्यापारासाठी प्रसिद्ध. बिंबिसारणे हे राज्य मगधात विलीन केले.

मगध :
अंगच्या पश्चिमेला . बिहार मधील पाटणा व गया जिल्ह्यात. गंगा नदी किनारी.

काशी :
वरूणा आणि अशी या नद्या नि वेढलेली वाराणसी नगरी. जातक कथांमध्ये उल्लेख.

कोशल :
सध्याच्या अयोध्या परिसरात. सदानिरा म्हणजे गंडक नदी आणि सर्पिका नदी यांच्या मध्ये. शरयू नदीच्या उत्तरेकडे उत्तर कोशल त्याची राजधानी श्रावस्ती. तर दक्षिणेकडे दक्षिण कोशल त्याची राजधानी कुशावती. प्रसेनजीत हा महत्वाचा राजा.

वृज्जी :
नऊ जनपदांचा संघ. वैशाली राजधानी. सध्याचा बिहारमधील मुझफ्फरपूर जिल्हा . अजातशत्रु याने हे गणराज्य मगधात  सामील केले.

मल्ल :
नऊ जनपदांचा संघ. रामायण व महाभारत काळापासून अस्तीत्वात. कुशिनगर व पावा ह्या राजधान्या.

चेदी:
य मुना तीरावर आजच्या बुंदेलखंड भागात . सुक्तिमती राजधानी. चेदिनी कालिंग परिसरात राज्य स्थापिले याचा संदर्भ हाथीगुंफा या शिलालेखात .

वत्स :
सध्याच्या अलाहाबाद जवळ . राजसत्ताक. कौसंबी ही राजधानी. बुद्धांच्या काळात राजा उदयन प्रसिद्ध त्याने अवंतीची राजकन्या वासवदत्त हिच्याशी विवाह केला. भासाच्या स्वप्नवासवदत्ता या नाटकात प्रमुख व्यक्तिरेखा.

कुरू :
इंद्रप्रस्थ ही राजधानी असलेली प्रमुख कौरव सत्ता . कौरव्य नावाचा जनपदी . राजसत्ताक . आजचा दिल्ली परिसर.

पांचाल :
दिल्लीच्या पूर्वेला आणि उत्तरेला . गंगा नदी . उत्तरेला उत्तर पंचल राजधानी अहिच्छत्र व दक्षिणेला दक्षिण पांचाल कांपील्या . राजसत्ताक

मत्स्य :
जयपूर , अलवार आणि भरतपुर  परिसर .आजचे वैराट म्हणजेच विराटनागरी हे राजधानी.

सुरसेन :
यमुनेच्या काठावर. मथुरा ही राजधानी. पाणिणी च्या अष्टाध्यायी मध्ये उल्लेख.

**अवंति:**

मध्य प्रदेशात उज्जैन परिसरात. बेचावती नदीच्या काठी. महिष्मती ही राजधानी होती. प्रद्योत च्या काळात उज्जैन राजधानी बनली. मगधाच्या  शिशूनाग याने अवंतीचा परभाव केला .

**गांधार :**

आजच्या पेशावर आणि रावळपिंडी परिसरात. पेशावर पुरुषपूर नावाने ओळखले जात. तक्षशीला ही राजधानी. पुष्कर सरीन गांधारचा राजा.

**कंबोज :**

वायव्य सरहद्द प्रांत. सुरवातीला राजसत्ताक नंतर गणराज्य  तर मौर्य काळात येथे संघराज्य होते. कंबोज राजधानी .

**अश्मक :**

गोदावरी नदी तीरावर पाली भाषेत अस्सक म्हणायचे . मुलक नावाचे जनपद ही होते . दोघांच्या मधून गोदावरी जायची. अस्सक जनपदात  बावरी नावाचा भिखू राहत असे. त्याचे वर्णन बावरी जातकात. त्या नुसार पोदन किंवा पोतण ही राजधानी. नांदेड पासून 6 किमी असलेले बोधन ( सध्या निजामाबाद जिल्ह्यात ) . मुलक मराठवाड्यात पैठण परिसरात अस्तीत्वात. त्यांची राजधानी प्रतिष्ठान म्हणजे पैठण .

सोळा महाजनपदांची प्राचीन व आधुनि क नावे :

(१) काशी (बनारस),
(२) कोसल (लखनौ),
(३) मल्ल (गोरखपूर)
(४) वत्स (अलाहाबाद)
(५) चेदि (कानपूर),
(६) कुरु (दि ल्ली),
(७) पांचाल (रोहिल खंड),
(८) मत्स्य (जयपूर),
(९) शूरसेन (मथुरा),
(१०) अश्मक (औरंगाबाद-महाराष्ट्र),
(११) अवंती (उज्जै न),
(१२) अंग  (चंपा-पूर्व बि हार),
(१३) मगध (दक्षि ण-बि हार),
(१४) वृज्जी (उत्तर बि हार),
(१५) गांधार (पेशावर),
(१६) कंबोज (गांधारजवळ)

कोसल
महाजनपदाचा
वि स्ता र हि मालयच्या
पायथ्या शी नेपाळ आणि
उत्तर प्रदेश या ठि काणी
झाला होता.
राज्या तील श्रावस्ती ,
कुशावती आणि साकेत
ही नगरे प्रसिद्ध होती.
l श्रावस्ती ही कोसल
महाजनपदाची राजधानी
होती.
l गौतम बुद्ध
श्रावस्ती मधील
जेतवन या प्रसिद्ध
वि हारात दीर्घ काळ
राहिले होते.
l कोसलचा राजा
प्रसेनजि त हा वर्ध मान
महावीर आणि गौतम
बुद्ध यांचा समकालीन
होता.
l कोसलचे राज्य
मगधामध्ये विलीन झाले.

वत्स महाजनपदाचा
वि स्ता र उत्तर प्रदेशातील
प्रयाग म्हणजे
अलाहाबादच्या
आसपासच्या प्रदेशात
झाला होता.
l कोसम म्हणजेच
प्राचीन काळचे कौशांबी
नगर होय.
l हे एक महत्त्वा चे
व्या पारी केंद्र होते.
कौशांबीतील
तीन अत्यं त श्रीमंत
व्या पाऱ्यां नी गौतम
बुद्ध आणि त्यां चे
अनुयायी यांच्या साठी
तीन वि हार बांधले होते.
l राजा उदयन हा गौतम
बुद्धां चा समकालीन
होता.
l राजा उदयनानंतर
वत्स महाजनपदाचे
स्वतंत्र अस्ति त्व
फार काळ टि कले
नाही. ते अवंती
महाजनपदाच्या राजाने
जिंकून घेतले.

मध्य प्रदेशातील
माळवा प्रदेशामध्ये
अवंती हे प्राचीन
महाजनपद होते.
l उज्जयि नी (उज्जै न) हे
नगर ही त्या ची
राजधानी होती.
l उज्जयि नी हे एक
महत्त्वा चे व्या पारी केंद्र
होते.
l अवंतीचा राजा प्रद्यो त
हा वर्ध मान महावीर
आणि गौतम बुद्ध
य ांचा समकालीन
होता.
l अवंतीचा राजा
नंदीवर्ध न याच्या
कारकिर्दी त अवंती
मगध साम्राज्यात विलीन
झाले.

हारमधील पाटणा,
गया या शहरांच्या
आसपासचा प्रदेश
आणि बंगालचा काही
भाग या प्रदेशात
प्रा चीन मगध
महाजनपद होते.
l राजगृह (राजगीर) ही
त्या ची राजधानी
होती.
l महागोवि ंद या
वास्तुवि शारदाने
बि ंबि साराचा
राजवाडा
बांधला होता.
जीवक हा प्रसिद्ध
वैद्य बि ंबि साराच्या
दरबारात होता.
l बि बि साराने गौतम
बुद्धां चे शि ष्यत्व
पत्करले होते

काही विद्वानांनी ऋग्वेद  मध्ये उल्लेख केलेल्या किकाटा  या जमातीची ओळख त्यांच्या शासक प्रेमगंधाने केली आहे - ते मगधांचे पूर्वज आहेत कारण कीकाटा नंतरच्या ग्रंथांमध्ये मगध हा प्रतिशब्द म्हणून वापरल गेला आहे;  अथर्ववेदातील मगधांप्रमाणेच, ऋग्वेद, वैदिक विधी न करणाऱ्या ब्राह्मणवादी भारताच्या सीमेवर राहणारी, एक प्रतिकूल जमात म्हणून किकटांबद्दल बोलतो.

मगध लोकांचा पुरातन संदर्भ अथर्ववेदात आढळतो,. राज्याचे मूळ म्हणजे गंगेच्या दक्षिणेस बिहारचे क्षेत्र; त्याची राजधानी राजधानी (आधुनिक काळातील राजगीर), नंतर पाटलिपुत्र (आधुनिक पटना) होती. सुरुवातीला राजगृह 'गिरीवृज्जा' म्हणून ओळखले जात असे आणि नंतर अजातशत्रुच्या कारकिर्दीत राजगृह म्हणून ओळखले जाऊ लागले. मगधने अनुक्रमे बिहार आणि बंगालच्या बहुतेक भागांचा विस्तार करून अनुक्रमे वज्जी परिसराचा आणि अंगचा विजय मिळविला.  राज्य अखेरीस बिहार, झारखंड, ओरिसा, पश्चिम बंगाल, पूर्व उत्तर प्रदेश आणि आज बांगलादेश व नेपाळ या देशांभोवती आहे.

जोग आणि बौद्ध ग्रंथांमध्ये मगध या प्राचीन राज्याचा फार उल्लेख आहे. रामायण, महाभारत आणि पुराणातही याचा उल्लेख आहे**.**



मगध साम्राज्य इ. स. पू. सहाव्या शतका पासून इ. स. पू. चौथ्या शतकापर्यंत उत्तर भारतातील महत्वाचे घराणे.

तीन घराणी :

1) हर्यंका घराने : (इ. स. पू. 544 ते इ. स. पू. 413)

1) राजे बिंबिसार (इ. स. पू. 544 ते इ. स. पू. 492)

- बुद्धांच्या समकालीन . अंग जिंकून घेतले. तीन राण्या. 1) कोसल राजा प्रसेनजीत ची बहीण 2) वज्जी राज्याची लिच्छवी राजकुमारी 3) पंजाब मधील मद्रा जमातीची प्रमुख.
- मगध चा सर्वात महत्वाचा शत्रू अवंती चा प्रद्योत याच्याशी संघर्ष होत होता. पुढे ते मित्र बनले. बिंबिसारणे आपला वैद्य जीवका उज्जैन ला पाठवला.
- बौद्ध ग्रंथांनुसार त्याने बौद्ध धर्म स्वीकारला. तर उत्तराध्ययन या जैन ग्रंथातील उल्लेखानुसार त्याने जैन धर्म स्वीकारला असावा.

2) अजातशत्रू : (इ. स. पू. 493 ते इ. स. पू. 462 )

- बिबि साराचा मुलगा अजातशत्रू यानेही मगधाचा वि स्ता र करण्या चे धोरण स्वी कारले. त्या ने पूर्वेकडील अनेक गणराज्ये जिकून घेतली. अजातशत्रूच्या काळात मगधाची भरभराट झाली. तसेच कोसल , काशी, वैशाली जिंकून घेतले. कोशल राजकन्या बाजीरा हिच्याशी विवाह.
- त्याने बौद्ध धर्म स्वी कारला होता. गौतम बुद्धां च्या महापरिनिर्वा णानंतर अजातशत्रूच्या कारकिर्दी त राजगृह येथे बौद्ध धर्मा ची पहिली संगि ती म्हणजेच परिषद झाली.

3) उदयन किंवा उदयभद्र : (इ. स. पू. 460 ते इ. स. पू. 444 )
त्याने गंगा आणि सोन नदीच्या संगमावर पाटणा याठिकाणी किल्ला बांधला.

2) शिशुनाग घराने : (इ. स. पू. 413 ते इ. स. पू. 334 )

- इ. स. पू. 413 मध्ये बनारस चा राजा शिशुनाग हे मगध साम्राज्याचे राजे बनले. त्यांनी राजधानी वैशाली या ठिकाणी नेली. या च काळात अवंती जिंकून घेऊन मगध साम्राज्यास जोडले.

3) कालशोक :

- शिशुनाग नंतर हा सत्तेवर. यालाच काकवर्णी म्हणत.
- याच्या काळात राज्यात दुसरी बौद्ध धर्मपरिषद झाली.

3) नंद घराने : (इ. स. पू. 324 ते इ. स. पू. 264 )

- इ. स. पू. 4 थ्या शतकात सत्तेवर आलेले हे पहिले क्षत्रियेतर घराने.
- जैन ग्रंथातून ह्या घराण्याचा संस्थापक – नापित किंवा नापितदास .
- बौद्ध ग्रंथातून ह्या घराण्याचा संस्थापक – अनातकुलीन
- पौराणिक ग्रंथातून ह्या घराण्याचा संस्थापक – महापद्म नंद
- महाबोधिवंश या बौद्ध ग्रंथातून नंद घराण्यातील नऊ राजांची नावे आढळतात.
- महाबोधवंश ग्रंथातून ह्या घराण्याचा संस्थापक – उग्रसेन (महापद्म नंद व उग्रसेन एकच असावेत )
- नंदकडे अफाट संपत्ती होती.
- सैनिक बळ मोठ्या प्रमाणावर. पायदळ, घोडदळ, रथदळ आणि हत्ती दळ असे चतुरंग सैन्य त्यां च्या पदरी होते. त्यां नी वजनमापांची प्रमाणि त पद्धत सुरू केली. 20हजार घोडदळ, 2 लाख पायदळ , 2 हजार रथदल , 3 हजार हत्तीदळ

अशमक आणि मुलक ही जनपदे नंदांनी मगध साम्राज्यास जोडली. त्यास नंदडेरा असे नाव दिले ते म्हणजेच सध्याचे नांदेड

- नंद घराण्या च्या शेवटच्या राजाचे नाव धनानंद किंवा कैवर्त असे होते. त्या च्या काळापर्यंत मगध साम्राज्या चा वि स्ता र पश्चि मेकडे पंजाबपर्यंत झाला होता.धनानंदाच्या कारकिर्दी त चंद्रगुप्त मौर्य या महत्त्वाकांक्षी तरुणाने पाटलिपुत्र जि कून घेतले, नंद राजवटीचा शेवट केला आणि मौर्य साम्राज्या चा पाया घातला.
- याच्या कारकिर्दीत मेसीडोणीयाचा राजा अलेक्झान्डर याने भारतावर आक्रमण केले.
- मगध साम्राज्य मैदानी प्रदेशात.
- तांदळाचे उत्पादन . उत्पादन तसेच वस्तु विक्रीवर कर .

बौद्ध कालीन समाजजीवन

- कारागिरांचे अस्तित्व : वैशालीमधील सद्दलपुट्ट येथे कुंभाराची 500 दुकाने.
- वाराणसी येथे व्यापारांची गल्ली असा उल्लेख.
- खेड्यांचा उल्लेख आढळतो.
- कराचा बोजा शेतकरी व वैश्या वर पडत असे. शेतकरी एक षष्ठान्श कर देत.
- युद्धात हत्तींचा प्रभावी वापर.
- स्पष्ट दिसणारी वर्णव्यवस्था .
- गृहपती ही संज्ञा श्रीमंत व्यापाऱ्यासाठी.
- राजाच्या मदतीला अधिकारी वर्ग : उच्चाधिकारी ( ब्राह्मण अथवा पूरोहित यामधून ) – महामात्र , वर्षकार मगध येथील तर दीर्घचारण कोशल मधील प्रभावी मंत्री . सभा व समित्या समाप्त झाल्या. त्यांची जागा परिषद ने घेतली. ( त्यात फक्त ब्राह्मण यांचा समावेश )
- नागरी व गन्हेगाराचे कायदे वर्णभेदावर आधारित.

इराणची आणि मेसोडोणीयाची आक्रमणे. :

इराण : इराणच्या आरमेनियम राजकर्त्या ने वायव्य सरहद्द भागात आक्रमणे केली.

दार्युष किंवा दारियस :

- इराणी सत्ताधीश
- इ. स. पू. 516 मध्ये भारतच्या वायव्य भागातील पंजाब व सिंध प्रदेश ताब्यात घेतला.
- सम्राट दार्युशच्या काळात भारत आणि इराण यांच्या मध्ये राजनैति क संबंध प्रस्थापि त झाले. त्यातून व्यापार आणि कला या क्षेत्रां तील देवाणघेवाण वाढली.
- सम्राट दार्युशने त्या च्या साम्राज्या त सर्वत्र 'दारिक' नावाचे एकाच प्रकारचे चलन लागू केले.
- पर्सि पोलीस हे राजधानीचे शहर सम्राट दार्युशच्या काळात बांधले गेले. पर्सि पोलीस हे ठिकाण इराणमध्ये आहे
- खरोष्टी लिपि इराण लोकांनी भारतात आणली. यात अरेबिक प्रमाणे उजवीकडून डावीकडे लेखन.
- मौर्य कालीन शिल्पकलेवर इराणी शिल्प कलेचा प्रभाव .

ग्रीक सम्राट अलेक्झांडर ऊर्फ सिकंदर

- इ.स.पू. ३२६ मध्ये भारताच्या वायव्य प्रदेशावर स्वा री
- . सि धू नदी ओलांडून तो तक्षशिलेस आला. या तरीही पंजाबपर्यंत पोचण्या त सिकंदर यशस्वी झाला,

सैनिकांना मायदेशी जाण्या चे वेध लागले होते. त्यांनी त्याच्याविरुद्ध बंड पुकारले. सिकंदराला माघार घेणे भाग होते.

- भारतातील जिकलेल्या प्रदेशांच्या व्यवस्थे साठी त्याने ग्रीक अधिकाऱ्यां च्या नेमणुका केल्या आणि त्यां ना 'सत्रप' असे म्हटले.
- त्या नंतर तो परत फि रला. वाटेत बॅबिलोन येथे इ.स.पू. ३२३ मध्ये तो मरण पावला. हे स्थळ आजच्या इराकमध्ये आहे.
- सि कंदराच्या आगमनामुळे भारत आणि पश्चि मेकडील जग यांच्या तील व्या पार वाढला.

- ग्रीक मूर्ति कलेचा भारतीय कलाशैलीवर प्रभाव पडला. त्या तून पुढे गांधार नावाच्या कलाशैलीचा उदय झाला.
- ग्रीक राजांची नाणी वैशिष्ट्य पूर्ण असत. त्यावर एका बाजूला ते नाणे पाडणाऱ्या राजाचे चि त्र, तर दुसऱ्या बाजूला एखाद्या ग्रीक देवतेचे चित्र असे. नाण्या वर त्या राजाचे नाव असे. सिकंदराची नाणीही अशाच प्रकारची होती.
- तक्षशीलेचा राजा अंभी आणि झेलम आणि चिनाब नद्यांदरम्यान राज्य करणारा पोरस उर्फ पौरव हे प्रबळ राजे (पुरू) होते. अंभी हा अलेक्झांडर ला शरण आला. झेलम नदी किनारी पोरस आणि अलेक्झांडर यांच्यात युद्ध झाले. त्यात पोरस पराभूत झाला. पण पोरस चे युद्धातील शौर्य पाहून अलेक्झांडर ने त्याला राज्य परत दिले.

# मौर्य साम्राज्य

- मौर्य साम्राज्य हे भारताच्या इतिहासातील सर्वात मोठे साम्राज्य होते. (कालखंड इ.स.पू. ३२१ ते इ.स.पू. १८५) मौर्य साम्राज्याची स्थापना साम्राज्याचा संस्थापक चंद्रगुप्त मौर्य याने चाणक्य या तक्षशिला येथील त्याच्या शिक्षकाच्या मदतीने केली. ( चाणक्याची कारस्थाने त्याचे वर्णन विशाखादत्ता च्या मुद्राराक्षस या नाटकात केले आहे. )
- चंद्रगुप्त मौर्य हे मौर्य साम्राज्याचे संस्थापक तर सम्राट अशोक हे या साम्राज्यातील सर्वात प्रमुख शासक
- गंगेच्या खोऱ्यामधील मगध राज्यापासून उगम झालेल्या या साम्राज्याची राजधानी पाटलीपुत्र (आजचे पाटणा) ही होती.हे साम्राज्य इ.स.पू. ३२२ मध्ये चंद्रगुप्त मौर्य याने नंद घराण्याला पराभूत करून स्थापन केले. त्याने त्याकाळच्या भारतातील सत्तांच्या विसंवादाचा फायदा उठवून आपल्या साम्राज्याचा पश्चिमेकडे व मध्य भारतात विस्तार केला. इ.स.पू. ३२० पर्यंत या साम्राज्याने सिकंदरच्या प्रांतशासकांना (क्षत्रप) हरवून पूर्णपणे वायव्य भारत ताब्यात घेतला होता.[२]
- हे साम्राज्य उत्तरेला हिमालय, पूर्वेला आसाम, पश्चिमेला पाकिस्तान, अफगाणिस्तान व इराणचे काही भाग इतके पसरले होते. भारताच्या मध्य व दक्षिण प्रदेशांमध्ये चंद्रगुप्त व बिंदुसार यांनी कलिंग (सध्याचा ओरिसा) हा प्रदेश वगळता विस्तार केला. नंतर सम्राट अशोकाने कलिंग जिंकून घेतला. अशोकांच्या मृत्यूनंतर साठ वर्षांनी मौर्य साम्राज्याचा अस्त झाला. इ.स.पू. १८५ मध्ये शुंग साम्राज्याने मौर्यांना पराभूत करून मौर्य साम्राज्य संपुष्टात आणले.
- चंद्रगुप्ताने आपल्या कारकिर्दीत सिंधू नदीपलीकडील अलेक्झांडरच्या साम्राज्याचा प्रदेश जिंकून घेतला. चंद्रगुप्ताने सेल्युकस निकेटर याला पराभूत करून इराणचेही काही भाग जिंकून घेतले. ग्रीक सेनापती युडेमस व पिथोन यांनी इ.स.पू. ३१६ पर्यंत राज्य केले. नंतर चंद्रगुप्ताने चाणक्याच्या मदतीने (जो त्याचा आता सल्लागार होता) त्यांना पराभूत केले.
- या साम्राज्याची लोकसंख्या अंदाजे ५ ते ६ कोटी इतकी होती व हे साम्राज्य हे जगातील लोकसंख्येनुसार मोठे साम्राज्य होते.
- मुद्राराक्षस या काव्यात विशाखदत्ताने चंद्रगुप्त मौर्य हा नंदांचा नातलग असल्याचे लिहिले आहे. प्राचीन बौद्ध धर्मग्रंथात (महावंश व दीपवंश )एक *मौर्य* नावाच्या क्षत्रिय जमातीचा उल्लेख आहे. ब्राह्मणी परंपरेनुसार चंद्रगुप्त मुरा या नंदाच्या दरबारातील शूद्र स्त्री च्या पोटी जन्माला आला असावा.
- चाणक्य म्हणजेच विष्णु गुप्त म्हणजेच कौटिल्यचे अर्थशास्त्र , मेगास्थेनीस चा इंडिका ग्रंथ ( मेगास्थेनीस हा सेल्युकास निकेटरचा मौर्य दरबारातील दूत ) आणि अशोकचे कोरीव लेख हे या काळाची माहिती देणारी प्रमुख साधने.